प्रकरण दुसरे

# क्रांतीसिंह नाना पाटील

क्रांतीसिंह नाना पाटील यांचा जन्म ३ ऑगष्ट १९०० ला बहे या आजोळच्या गावी झाला. त्यांचे मुळ गाव येडेमच्छिंद्र[१] ता.वाळवा नाना पाटलांना लहानपणापासून सुदृढ प्रकृतीची देणगी लाभली होती. येडेमच्छिंद्र येथे तिसरीपर्यंतचे शिक्षण झाले. त्यानंतर नरसिंहपूरला कांही शिक्षण घेतले. पांडव-प्रताप, हरी-विजय, राम-विजय, कृष्ण-लिलामृत, पंचरत्न - गीता इत्यादी सर्व ग्रंथ रामपूरी बुवांच्या देखरीखीखाली वाचून काढले. नानांचे उर्वरीत शिक्षण खोताचीवाडी येथे राहून नागराळे येथे झाले.[२]

यानंतर नानांनी आपल्या गावात तलाठ्याच्या हाताखाली कामास प्रारंभ केला. ग्रामीण जनतेच्या व विशेषत: सामान्य शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेची जाणीव झाल्यानंतर त्यांच्या जिवनात बदल घडवून आणण्यासाठी आपण काही तरी केले पाहिजे, असे नाना पाटलांच्या मनाने घेतले. आपण ज्या समाजातून आलो आहोत, त्यांची अशी ससेहोलपाट होताना आपण केवळ स्व:ताच्या आयुष्याचा विचार करणे हे खऱ्या पुरुषार्थाचे लक्षण नव्हे असे त्यांना वाटले. याच सुमारास दक्षिण महाराष्ट्रात राजर्षी शाहू महाराज (१८८४-१९२२) यांच्या प्रेरणेने सत्यशोधक चळवळ जोमात आली होती. या चळवळीने बहूजन समाजात वैचारीक जागृती घडवून आणण्याच्या कार्याला प्राधान्य दिले होते. सत्यशोधक चळवळीच्या वरील कार्यामुळे खेडोपाड्यातील सामान्य जनतेची स्थिती सुधारण्यास निश्चित मदत होईल अशी नानां पाटलांची खात्री पटली त्यामुळे ते सत्यशोधक चळवळीत सामील झाले.[३]

१९२० साली कराड तालुक्यातील सुरली सजा येथे नानांची तलाठी म्हणून नेमणूक झाली. तलाठी असतानाही सत्यशोधक समाजाच्या कार्यक्रमात हिरहिरीने सहभागी झाले. त्यामुळे त्यांची बदली वाठारला झाली. तेथे त्यांच्यावर आरोप ठेवून त्यांना नोकरीतून मुक्त केले. यानंतर नाना हळूहळू भारतीय राष्ट्रीय चळवळीकडे ओढले गेले. ब्रिटीश सरकारने त्यांच्यावर आर्थिक आफरातफरीचा आरोप ठेवून वॉरंट काढले.[४]

## काँग्रेसच्या झेंड्याखाली :

सत्यशोधकी कार्यकर्ते असलेले क्रांतीसिंह १९३० च्या सुमारास म. गांधींच्या काँग्रेस चळवळीत सामील झाले. हा योगायोग नव्हता वा आपघातही नव्हता. ते क्रांतीसिहांनी विचारपूर्वक उचलेले पावूल होते. त्यांच्याप्रमाणेच केशवराव जेधे, म. शिंदे, भाऊराव पाटील, आत्माराम पाटील अशा अनेक सत्यशोधकी (अथवा ब्राम्हणेत्तर) चळवळीतील नेत्यांनी हाच निर्णय घेतला होता. १९२० पासूनच राष्ट्रीय स्वातंत्र्याचे विचार नानांच्या डोक्यात घोंगावत होते.[५]

६ एप्रिल १९३० रोजी महात्मा गांधीनी दांडी येथे मीठाचा सत्याग्रह करून सविनय कायदेभंगाच्या चळवळीस सुरवात केली. या चळवळीला संपूर्ण देशातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. देशातील सर्व रोगांचे मुळ इंग्रजांची राजनिती आहे, म्हणून याला प्रत्येक भारतीयांनी प्रतिकार केला पाहिजे असे नानांचे मत होते.

सविनय कायदेभंगाच्या चळवळीत नाना पाटलांनी सातारा जिल्ह्याच्या ग्रामीण भागात लोकजागृती घडवून आणण्याचे अतिशय महत्वपूर्ण कार्य केले. त्यांनी एका काठीला तिरंगा लावून खेड्यापाड्यातील चावडीसमोर जावून राष्ट्रीय चळवळीचा प्रचार केला. काँग्रेस व महात्मा गांधींच्या स्वराज्याचा संदेश ग्रामीण विभागाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. खेड्यातील सर्व लहान थोर मंडळी नानांचे विचार ऐकायला जमत. स्वराज्य म्हणजे काय? व काँग्रेसने इंग्रजांविरुध्दचा लढा कोणत्या उद्देशाने चालवला आहे ? याची माहीती सातारच्या ग्रामीण जनतेला नाना पाटलांनीच करून दिली.[६]

## इंग्रजी सत्ता मानायची नाही हे सुत्र :

क्रां. नाना पाटील हे महात्मा गांधीच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक कोडे होते. म. गांधीच्या सर्व लढातंत्रात भूमिगत लढा कधीच नव्हता. पण क्रां. नाना पाटील १९३२ साली

स्वातंत्र्याच्या लढ्यात उतरले ते भूमिगत होऊनच. म. गांधीनी सागितलेली एकच गोष्ट त्यांना माहीत होती. ती म्हणजे इंग्रजी सत्ता या देशातून गेली पाहीजे. त्या जोडीला जंगलसत्याग्रहापासून वैयक्तीक सत्याग्रहापर्यंत सर्व लढातंत्रे नाना पाटलांनी अनुभवली. पण गांधीजीचीच लढासुत्रे त्यांनी अनुचरली असे नाही. इंग्रजी सत्ता मानायची नाही. हे सुत्र धरुन त्या सत्तेविरोधी स्वतःच्या लढातंत्रानेही जायचे हा त्यांचा मार्ग होता. इंग्रजी सत्ता हाच मुळी भारतावर अत्याचार होता. त्या सत्तेला विरोध करण्यासाठी वापरलेले लढातंत्र हे सदाचारातच मोडते असा विचार त्यांच्या प्रत्येक कृतीतून व्यक्त होत होता.[७]

नाना पाटलांच्या प्रचार कार्यामुळे पोलीस व सरकारी अधिकारी यांची झोप उडाली. सरकारने त्यांना पकडण्यासाठी वॉरंट काढले. अटक करण्यासाठी सरकारचे सरकारने चालविलेले सर्व प्रयत्न त्यांनी निष्फळ ठरविले. कांही वेळा तर पोलीसांच्या साक्षीने जाहीर सभा भरवून त्यांनी सरकारवर टीकेचे जोरदार कोरडे ओढले आणि सभा संपता संपता पोलीसांना हूल देऊन पळ काढण्यात यश मिळवले. या धामधुमीच्या दरम्यान त्यांच्या पत्नीच्या वडीलांचा व आजीचा मृत्यू झाला. कुटुंबातील एकापोठोपाठ एक मृत्यूच्या दाढेत जात असताना नाना पाटील मात्र पोलीसांचा पाठलाग चुकवित रानोमाळ भटकत होते.[८]

७ मार्च १९३१ साली गांधी व आयर्विन करारामुळे सर्व राजकीय कैद्यांची बिनशर्त सुटका झाली . तसेच राजकीय आणि भूमिगत पुढाऱ्यांच्यावरील पकड वॉरंटही रद्द झाले. पण नानांच्यावर तलाठी प्रकरणातील ठपका होता. त्यांचा निकाल लागूण नानांवर १००/- रु. दंड व तो न भरल्यास आणखी दोन महीने सक्तमजूरी अशी शिक्षा ठोटावली.[९]

## राजकीय कैदी :

आठ महिन्याची सक्त मजूरी भोगून नाना पाटील आले. तोवर चळवळ पून्हा उग्र बनली. गांधी , नेहरु , पटेल , यांच्या बरोबरच नाना पाटलांना दुसरी अटक १९३२ मध्ये

झाली. दोन महीन्यानंतर पोलीसांनी त्यांना पॅरोलवर सोडले. पण इस्लामपूरच्या पोलीस ठाण्यात दररोज दोनवेळा हजेरी देण्याची अट घालण्यात आली. हा काळ क्रांतीसिंहांच्या नेतृत्वाच्या कसोटीचा काळ बेचाळीसमध्ये जनतेने त्यानां बिनविरोध मान्यता का दिली ? याचे उत्तर या खडतर तपश्चर्येत आहे.

इस्लामपूरात त्या काळात गाडगे महाराजांचे एक शिष्य होते. त्यांच्याकड दररोज जेवणावळी चालत. थोडे दिवस तेथे नाना पाटलांनी जेवण केले. पण पुढे पोलीसांची वक्रदृष्टी नको म्हणून त्यांनी जेवग देण्यास नकार दिला. दुसरे एक ग्रहस्थ थोडे दिवस चोरुन जेवण द्यायचे. पण पुढे तेही घाबरले. मग मात्र नाना पाटलांनी रस्त्यावर एका झाडाच्या पारावर मुक्काम ठोकला. एका पातळ किलतानाच्या पोत्याला मध्ये एक व दोन बाजूला भसके पाडून ते पोते सदऱ्यासारखे अंगावर चढविले. सामान्य लोक त्यांना '' पोते बाबा '' म्हणू लागले. इस्लामपूरच्या स्टँडवर नाना पाटलांनी पोटासाठी हमाली सुरु केली. पण हमाल त्यांना एक नेता म्हणून ओळखत होते. सगळ्या हमालांनी क्रांतीसिंहांना विनंती केली . आम्ही तुमचे खानावळीचे बिल भागवितो. पण तुम्ही हमाली करु नका. आम्हाला देश - सेवेच्या चार गोष्टी सांगा. शेवटी हमाल वर्गनी काढून महीन्याला दोन रुपये श्री. अण्णा भांड यांच्या खानावळीत भरु लागले. दररोज एकवेळच्या जेवणाची सोय झाली. रात्री पैशाला दोन मक्याची कनसे घ्यायची. ती भाजून खायची आणि पारावर त्या पोत्यांच्या सदऱ्यातच रात्र काढायची असे कसेबसे दिवस घालविले.[१०]

## १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीला योगदान :

१९३० साली राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी कायदेभंग चळवळीचा आदेश सर्व भारतीयांना दिला. देशभर या चळवळीला चांगलाच प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रात आणि सातारा जिल्ह्यात नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्य शेतकऱ्यांनी १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत महत्वाचे योगदान केले. सातारा जिल्ह्यातील बिळाशीचा

सत्याग्रह तर साऱ्या देशभर गाजला. या सत्याग्रहात चार हजार लोक जमले होते. [११] वाळवा तालुक्यामध्ये गावोगाव जाऊन लोकांना सत्याग्रहाला हजर राहण्याचे आवाहन नाना पाटलांनी केले.

बिळाशी प्रमाणेच रेठरेधरण येथील जंगल सत्याग्रह खूपच गाजला हा सत्याग्रह नाना पाटील व बापूसाहेब देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पार पाडला. सत्याग्रहाच्या जागेवर ७ ते ८ हजारांचा जनसमुदाय जमला होता. रेठरेधरण येथील गोरखनाथ मठापासून सर्व लोक कमल दर्ग्याकडे गेले प्रत्यक्ष सत्याग्रहाच्या ठिकाणी नाना पाटलांच्या हस्ते नारळ फोडण्यात आला. आणि नंतर जमलेल्या सर्व लोकांनी सरकारी जमीनीवरील गवत कापून सत्याग्रह केला. हा सत्याग्रह यशस्वी होण्यासाठी नानांनी आपल्या भागाचा दौरा केला होता. [१२]

सत्याग्रहात भाग घेण्यास जास्तीतजास्त लोकांना प्रवृत्त करण्यासाठी सातारा जिल्ह्यात ठिकठिकाणी शिबीरे आयोजीत केली होती. वाळवे तालुक्यातील रेठरेहरणाक्ष या गांवी डॉ. हिंगमिरे यांनी एक शिबीर भरवले होते. नाना पाटील यांनी या शिबीरात सहभागी होवून चळवळीचे प्रचारक म्हणून काम केले. तसेच ठिकठिकानी उभारण्यात आलेल्या शिबीरात एकसुत्रीपणा आणण्याची जबाबदारी नाना पाटील यांच्यावर होती. यांच्या जोडीला गावोगाव जाऊन जाहीर सभांच्या माध्यमातून जनतेत जागृती घडवून आणण्याचे काम नाना पाटील करत होते.

## ग्रामीण जनतेला निर्भय बनविण्याची शिकवण :

आपल्या राजकीय जिवनाच्या या कालखंडात नाना पाटलांनी कोणती महत्वपूर्ण कामगिरी केली असेल तर ती ही की त्यांनी ग्रामीण जनतेला निर्भय बनविन्याची शिकवण दिली. १९३० च्या सुमारास कॉंग्रेस व महात्मा गांधी यांच्या कार्यामुळे शहरी विभागात कांही प्रमाणात जनतेत राजकीय जागृती झाली. तथापि ग्रामीण जनता मात्र राजकारणा संबंधी अडाणी राहीली होती. तिला देशाच्या राजकीय स्थिती बाबत कसलीही जाण

नव्हती. सरकारविषयी व सरकारी अधिकाऱ्याविषयी कमालीचा भयगंड त्यांच्यात निर्माण झाला होता. सरकारी अधिकाऱ्यांच्या समोर उभे राहण्यास लोक घाबरत असत. पोलीसांबाबत तर त्यांना अतिशय धास्ती वाटत असे.

आपल्या लोकांना राज्कीय दृष्ट्या जागृत बनवायचे असेल तर प्रथम त्यांना भयमुक्त केले पाहीजे हे नाना पाटलांनी ओळखले. त्यामुळे लोकांच्या मनातील पोलीस व अन्य सरकारी अधिकाऱ्याविषयीची भीती दूर करण्याच्या प्रश्नाला त्यांनी अग्रक्रम दिला. त्याकरता नाना पाटील आपल्या व्याख्यानातून पोलीसांवर व अधिकाऱ्यांवर घणाघाती टिका करीत. त्यांच्यावर अक्षरश : तुटून पडत प्रसंगी त्यांचा उपहासही करीत. नोकरशाहीच्या काळ्या कारवायांवंर ते प्रकाश टाकत त्यांच्या भाषणाला विनोदाची झालर असे.

क्रांतीसिंह नाना पाटील सभ्येमध्ये भाषणास उभे राहताना फडातील पैलवानाप्रमाणे अगोदर शड्डू ठोकून म्हणजेच गरगरीत मांडीवर थाप मारुन" भारत माता की जय ", ' श्री छत्रपती शिवाजी महाराज की जय ' , " महात्मा गांधी की जय" अशा घोषणा देत असत त्यानंतर आपले दोन्ही हात जोडून सभेला नम्रपणे अभिवादन करुन पुढे सांगत असत की, " माझ्या शेतकरी बांधवांनो आणि भगिनींनो ! मी तुम्हास चार शब्द सांगणार आहे, ते तुम्ही शांत चित्ताने ऐकून घ्यावेत , अशी माझी नम्र विनंती हाय " [१३]

श्रावणातल्या शेवटच्या सोमवारी देवराष्ट्रे ता. खानापूर येथे घाटावरील व घाटाखालील पैलवानांच्या कुस्त्यांचा फड भरणार होता. त्यामध्ये क्रां. पाटलांचे भाषण हमखास होणार होते, म्हणून पाटलांना पकडण्यासाठी पोलीस पार्टी टपूनच बसली होती. दरसालच्या रिवाजाप्रमाणे फडावर सभा घेण्यासाठी आणि 'पोलीस पार्टी येईल ' हे जाणूनच ते सभेला उपस्थित राहीले होते. सुमारे दिडशे तगड्या जवानांच्या कोडाण्यात आणि चार ते पाच हजार लोकांच्या जनसमुहात क्रां. नाना पाटलांनी इंग्रजसरकारच्या लुटारु कारभारावर खरपूस टिका केली , आणि सभेला आलेले फौजदार व पोलीस पार्टी यांच्या संबंधीची भीती लोकांच्या मनातून घालविण्यासाठी ते सभेला उद्देशून म्हणाले ते फौजदार व पोलीस

यांच्याकहे हात करीतच ! '' ही इंग्रजांची भाडोत्री शिपूर्डी आमचेच भाऊबंद हायत, त्यांचं आईबा काय इंग्लंडात जन्माला आल्याल न्हाईत ! हिंतच जन्मलेत. ह्यो कदम - पाटील फौजदार ! म्हातारा झालाय - दम्याचा विकार हाय ह्याला ! चार दोन वर्सात पेनसनीत जाईल , पन इंग्रजांची इमानदारी सोहवत न्हाई ! ह्यो मेल्यावर ह्येला खांदा द्यायला कोनी जावू नका! इंग्रज येवून देतील ह्येला खांदा ! ह्योला थोडीथाखडी न्हायीत , तर आकरा पोर हायती ! त्येची लग्न इंग्लंडासन पोरी आनून कर म्हनावं आता ! अवो ह्यो मेल्याव ह्येच्या दिसाची आमटी आमीच पिनार ! आन आम्ही मेलो तर आमच्या दिसाची आमटी ह्यो पिनार ! पर ह्येच्या टाळक्यात ह्यो येतंया कुठ ! ह्या कदम फौजदारावर हमी धरणारा ह्यो देवराष्ट्राचा मारुती पाटील ------- जी हुजऱ्या ! ह्यच्या मड्याला कुनीबी जावू नका , आनी ह्या सगळ्या शिपुर्ड्यासनी कोनी भिवू नका ![१४] तीन तास ते एकसारखे बोलत होते. हजारो लोक देहभान विसरुन डोलत होते नुसते ! या ठिकाणी त्यांना पकडावयाला पोलीस पार्टी आली होती , पण नाना पाटील त्या प्रचंड गर्दीतून कसे निसटले आणि घोड्यावर बसून कसे पसार झाले , हे पोलीसांना कळलेच नाही.[१५]

## कायदेमंडळाची निवडणूक :

१९३५ च्या भारत विधायक कायद्यानुसार सन १९३७ च्या फेब्रूवारी महिन्यात भारतातील ११ प्रांताच्या कायदेमंडळाच्या निवडणूका घेण्यात आल्या. या निवडणूका लढवाव्यात कि नाही यावर काँग्रेसच्या नेत्यात सुरवातीला बराच खल झाला परंतु अखेरीस निवडणूकीत भाग घेण्याचा कँग्रेसने निर्णय घेतला. नाना पाटलांनी या निवडणूकीत आत्माराम पाटील व इतर काँग्रस उमेदवार प्रचारासाठी जीवाचे रान केले. सातारा जिल्ह्यात दौरा , मिरवणुका, परिषदा यांच्या मार्फत प्रचार केला. त्यामुळे काँग्रेसला मोठे यश मिळाले १९३७ साली काँग्रेसने आपले मंत्रीमंडळ बनवले. साक्षरता प्रसार , शिक्षण , दारुबंदी इत्यादी लोकोपयोगी कामे काँग्रेस सरकारने हाती घेतली.[१६]

**वैयक्तिक सत्याग्रह :**

इ. स. १९३९ मध्ये युरोपात दुसऱ्या महायुध्दास प्रारंभ झाला. भारताच्या व्हइसरॉयने काँग्रेसच्या नेत्यांना विश्वासात न घेताच जर्मनि विरुध्द युध्द जाहीर केल्याने सरकार व काँग्रेस नेते यांच्यात मतभेद निर्माण झाले. परिणामी आठ प्रांतातील काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे दिले . त्यानंतर इ. स. १९४० च्या ऑक्टोंबर महिन्यात महात्मा गांधीनी सरकारच्या धोरणाविरुध्द असंतोष व्यक्त करण्यासाठी वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम सुरु केली. दुसऱ्या महायुध्दात भारतीय जनतेने इंग्रज सरकारच्या युध्द कार्याला मदत करु नये. युध्द विरोधी प्रचार करावा हा चळवळीचल उद्देश होता. वैयक्तिव सत्याग्रहाचे पहीले सत्याग्रही आचार्य विनोबा भावे होते. देशात विविध ठिकाणी करावयाच्या सत्याग्रहाची ओळख महात्मा गांधीनी केली होती. नाना पाटील यांची ओळख सातारासाठी करण्यात आली.

१९४० च्या अखेरीस बहे - बोरगांव ता. वाळवा या आपल्या आजोळी नाना पाटलांनी वैयक्तिक सत्याग्रह करुन इंग्रजांच्या सैन्य भरतीत सामील होऊ नका असे लोकांना आवाहन केले. हा सत्याग्रह पाहण्यासाठी वाळवा तालुक्यातून हजारो लोक उपस्थित झाले. नानांच्या भाषणाने अधिकच उत्साही होऊन , अधिकच निर्भय बनले. त्यावेळी सरकारने त्यांना अटक करून सहा महिने शिक्षा व ५० / - रु. दंड आणि दंड न भरल्यास आणखी ३ महिने शिक्षा अशी एकूण ९ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा केली.

१९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाची शिक्षा भोगून आल्यानंतर सातव्या दिवशी हणमंत वडिये, ता. खानापूर येथे आपल्या मुलीच्या गावी १९४१ साली वैयक्तिक सत्याग्रह केला. हा सत्याग्रह पाहण्यासाठी पंचक्रोशीतील लोक मोठ्या संख्येने आले होते. नानांनी आपल्या भाषणात इंग्रजी राजवटीवर कडाडून हल्ला केला. ते म्हणाले '' आमच्या नेत्यांचा विचार न घेता युध्द भरती करणाऱ्या या इंग्रज सरकारचा हुकूम मी मानीत नसून त्यांचा धिक्कार करीत आहे. लोकशाही निर्भय बना!, शेळीसारखे शेळपट बनू नका!. वाघासारखे झुंझार व्हा!''

असे म्हणताच पोलीसांच्या गाडीत बसले त्यावेळी नानांना साधी कैद व पन्नास रुपये दंड व तो न भरल्यास एक महिना जादा शिक्षा झाली. अशारीतीने नानांनी दोनवेळा वैयक्तिक सत्याग्रह केला.[१७]

नाना पाटलांनी आपल्यामागे अन्य कोणताही व्याप ठेवला नव्हता. राष्ट्रीय चळवळीचा प्रचार भारतमातेस स्वतंत्र्य करणे एवढाच ध्यास त्यांनी घेतला होता. त्यावेळी त्यांना प्रचाराच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नव्हत्या .परंतू त्यांनी अडचणीचा बाऊ कधी केला नाही. पायी प्रवास करीत खेडोपाड्यात जाहिर सभांचा कार्यक्रम त्यांनी अव्याहत चालू ठेवला. राजकीय कार्याच्या जोडीने विधायक कार्यालाही त्यांनी महत्व दिले होते. त्यामध्ये अर्थातच समाज सुधारणेच्या कार्यावर त्यांचा विशेष भर असे त्याचे कारण म्हणजे राजकीय व सामाजिक कार्यात भेद त्यांनी कधीच मानलाच नव्हता. सर्वसामान्य जनतेच्या सेवेचे साधन याच दृष्टिकोनातून त्यांनी वरील दोन्ही गोष्टींकडे पाहीले होते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून आपल्या मातृभूमीची मुक्तता करणे हे तर आपले कर्तव्यच आहे. पण त्याचबरोबर आपल्या लोकांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याच्या उद्दिष्टाकडेही लक्ष दिले पाहीजे हा विचार त्यांनी केला होता. त्यांच्या गांधी लग्न मोहीमेचा निर्देश करणे यासंदर्भात आवश्यक ठरते. लग्न समारंभातील सर्व डामडौल, उधळपट्टी यांना फाटा देवून अगदी अल्प खर्चात व साध्या पध्दतीने लावलेल्या लग्नाला त्यांनी गांधी लग्न असे नाव दिले. अशी अनेक लग्ने त्यांनी त्या काळात आपल्या भागात घडवून आणली होती. समाज सुधारणा व राष्ट्रीय चळवळ यांचे परस्पराशी असलेले नाते त्यांनी आपल्या कार्यक्रमातून दाखवून दिले होते.[१८]

## १९४२ ची चळवळ :

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन मुंबई येथे गोवालिया टँक मैदानावर ७ व ८ ऑगस्ट रोजी भरले होते. ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी अखिल भारतीय काँग्रेस समितीने

''छोडो भारत'' चा ठराव मंजूर केला व उघड क्रांती जाहीर केली. ''करेंगे या मरेंगे'' या आरोळ्या देशभर उठल्या. इंग्रजांना हिंदुस्थानातून हाकलून द्यायची सर्वांनी प्रतिज्ञाच केली. सातारा जिल्हा याबाबतीत आघाडीवर राहीला. त्याचबरोबर वाळवा तालुक्यातील अनेक स्वा.सै. नानांच्या नेतृत्वाखाली जमा झाले. आणि यावेळेपासून नानांच्या क्रांतीकारक जीवनाचा दुसरा टप्पा सूरू झाला.

गांधीजी व इतर नेत्यांना ९ ऑगस्ट रोजी सकाळी पकडण्यात आले. ही बातमी ऐकून सातारच्या लोकांचा संताप अनावर झाला. प्रखर राष्ट्रवादाने झपाटलेले काँग्रेस कार्यकर्ते साताऱ्यात एकत्र आले . त्यांनी आपखुशीने आंदोलन करण्याचे आणि पोलीसांना चकवण्यासाठी भूमीगत व्हायचे ठरविले. संतप्त कायकर्त्यांनी गावोगावी प्रभात फेऱ्या व सायंकाळी फेऱ्या काढल्या. सभा भरल्या व हरताळ पाळले . काहींनी रेल्वेगाड्या पाडल्या, सरकारी इमारती जाळल्या, पोस्टाच्या गाड्या लुटल्या. या हालचालींमुळे सारा जिल्हा ढवळून निघाला. असे जनजागरण करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या ५०० होती. त्यामध्ये नाना पाटील हे प्रभावी नेतृत्व होते. रात्रंदिवस ते प्रचार करत होते. त्यांनी आपल्या कामाची सुरूवात कुंडल येथून केली. ९ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी कुंडल येथे १०० ते १५० कार्यकर्त्यांची बैठक घेतली. नाना पाटील यांनी पोलीसांच्या हाती सापडू नये व सभा व्हाव्यात असे या बैठकीत ठरले.[१९]

## रेठरे बुद्रुकची बैठक :

यशवंतराव चव्हाण यांनी आंदोलनात एकसुत्रीपणा आणण्यासाठी चार - पाच तालुक्यातील महत्त्वाच्या भूमिगत नेत्यांची एक व्यापक बैठक रेठरेबुद्रुकच्या हद्दीत बोलविली.[२०] या बैठकीत जे निर्णय झाले त्यामुळे सातारा जिल्ह्यातील उत्स्फुर्त आंदोलनाचे दोन आठवड्यांच्या आत नियोजित आंदोलनात रुपांतर झाले. याबैठकीत घेतलेले निर्णय जिल्हाभर वैयक्तिक संपर्क साधून, जासूसामार्फत व पत्राद्वारे प्रस्तूत करण्यात आले. शिवाय

नाना पाटील, कासेगावकर वैद्य, बाबूराव चरणकर, बर्डे मास्तर, निवृत्ती काका, पांडू मास्तर इ. अनेक कार्यकर्त्यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रात दौरे काढून बैठकीत ठरलेले निर्णय पार पाडण्यासाठी भूमिगत कार्यकर्त्यांना व लोकांना प्रभावित व प्रवृत्त केले.

तालुका कचेऱ्यांवर २४ ऑगस्ट १९४२ ते १० सप्टेंबर १९४२ या काळात एकूण ६ मोर्चे (कराड, पाटण, तासगाव, वडूज, इस्लामपूर, शिराळा) येथे उघडपणे , पण शांततेत आणि अहिंसक मार्गाने काढण्यात आले.

पध्दतशीर प्रचार करता यावा म्हणून कार्यकर्त्यांचे गट पाडून त्यांना ठरावीक गावे वाटून देण्यात आली. नाना पाटील यांचेकडे किर्लोस्करवाडी हे गांव देण्यात आले. त्यांनी किर्लोस्कर इंजीनिअरींग वर्क्सच्या कामगारांची सभा घेतली नियोजित मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे त्यांनी आवाहन कामगारांना केले. ३ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्ते व लोक येरळा नदीच्या तीरावर एकत्र जमले. मोर्चा प्रत्यक्ष कसा न्यायचा? काय करायचे? यासंबंधीचे अंतिम नियोजन याठिकाणी करण्यात आले. त्याचबरोबर नाना पाटील आणि त्यांच्या बरोबर आलेल्या ५० कार्यकर्त्यांना पोलीस पकडतील म्हणून मोर्चातून वगळले.

तासगाव तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी २ सप्टेबर १९४२ रोजी तासगावच्या मामलेदार कचेरीवर मोर्चा काढला. सर्व लोक गावाबाहेर जमले. तिथेच सभेचा कार्यक्रम झाला. त्यानंतर हाच जमाव मिरवणूकीने कचेरीवर गेला. लोकांनी कचेरीवर तिरंगा झेंडा लावाला. आणि मामलेदार व इतर सरकारी अधिकाऱ्यांना गांधी टोप्या घालण्यास भाग पाडले. [२१]

## इस्लामपूर कचेरीवर मोर्चा :

इस्लामपूर कचेरीवर काढावयाच्या मोर्चाचे नियोजन वाळवा तालुक्यातील कार्यकर्त्यांनी केले. प्रचार नीटनेटका करता यावा म्हणून सर्व कार्यकर्त्यांना गावे वाटून दिली

A
13600

होती. नाना पाटील यांच्या वाटणीला किर्लोस्करवाडी, बुर्ली, आमणापूर, खेड व पुणदी ही गावे आली होती. नाना पाटील व इतर कार्यकर्त्यांनी (पांडू मास्तर) तासगांव, कराड, खानापूर व शिराळा पेठेतील बऱ्याच गावात जोरदार मोर्चाचा प्रचार केला. १० सप्टेंबर १९४२ या दिवशी निरनिराळ्या गावाहून कार्यकर्ते राष्ट्रीय घोषणा देत व गाणी गात इस्लामपूरला येत होते. पूर्वेकडून पुणदी गावची हद्द ओलांडून जमाव जुनेखेडच्या हद्दीत येताच नाना पाटील व जवळच्या कार्यकर्त्यांना खबरदारी म्हणून मोर्चातून वगळण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.[२२] आप्पा मास्तर यांनी आपल्या कुंभारगावातील मळ्यात त्यांना लपवून ठेवले होते. तेथेच ५ नोव्हेंबर १९४२ रोजी यशवंतराव चव्हाण, नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेत असे ठरले की कोणत्याही परीस्थितीत ढीले न पडता घातपाती चळवळ मोठ्या जोमाने पूढे चालू ठेवायची.

## भूमिगत चळवळीचा निर्णय :

वडूज व इस्लामपूर येथील मोर्चावर पोलीसांनी बेछुट गोळीबार केला. या घटनेचा नानांनी गांभीर्याने विचार केला. शांततापूर्ण काढलेल्या मोर्चावर पोलीसांनी जो गोळीबार केला त्यातून इंग्रजांची राजनिती स्पष्ट झाली.

याबदलत्या राजकीय परीस्थितीत कोणत्या मार्गाने वाटचाल करायची हा प्रश्न जिल्ह्यातील सर्वच लहानथोर कार्यकर्त्यांपूढे निर्माण झाला. कार्यकर्त्यांमध्ये या प्रश्नावर विचारमंथन सुरु झाले. स्वातंत्र्याची चळवळ चालू ठेवली पाहीजे या मुद्द्यावर सर्वांचे एकमत झाले. परंतू शांतातपूर्ण मार्गाने चळवळ करणे अशक्य आहे , याचीही सर्वांना कल्पना आली होती.

नाना पाटील यांनी या प्रश्नासंबंधी विचार विनिमय करण्यासाठी १९४२ च्या सप्टेंबर महिन्यात कुंडल येथे कांही प्रमुख कार्यकर्त्यांना एकत्र बोलाविले. कुंडल व त्याच्या आसपासचा परिसर हे दहा बारा वर्षांपासूनचे त्यांचे कार्यक्षेत्र बनले होते. भूमिगत

चळवळीच्या संदर्भात कुंडलची बैठक अतिशय महत्त्वपूर्ण ठरली. त्यावेळच्या भाषणात त्यांनी असे सांगीतले की ''आता या घडीला आपणापूढे दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे पोलीसांपूढे हजर होवून स्वःताला अटक करुन घेणे. आणि दुसरा मार्ग म्हणजे पोलीसांच्या दडपशाहीला तोंड देत देत भूमिगत राहून परकीय सत्तेशी संघर्ष करीत राहणे.'' माझ्या पूरते बोलावयाचे तर मी या निर्णयाला आलो आहे की, मला देशासाठी मरण पत्करावे लागले तर बेहत्तर ! मी तुरुंगात म्हणून जाणार नाही. नाना पाटलांच्या या म्हणण्याला सर्वांनी अनुकूलता दर्शविली.[२३]

## भूमिगतांचे विविध गट :

भूमिगत कार्य करणाऱ्या किंवा भूमिगत चळवळीत सहभागी झालेल्या जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांची एकसंघ संघटना नव्हती या कार्यकर्त्यांना आपली चळवळ गुप्त रीतीने चालवावी लागत असल्याने अशा जिल्हाव्यापी संघटनेची बांधणी करणे शक्य नव्हते. भूमिगतांना व्यवस्थित कार्य करता यावे म्हणून कार्यकर्त्यांचे कार्यक्षेत्र विशिष्ट प्रादेशिव विभागामध्ये विभागले होते. त्या - त्या विभागातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली  संबंधीत गटाचे कार्य चालवले जात होते. सातारा जिल्ह्यामध्ये चार पाच गट भुमिगत चळवळ चालविणारे होते. त्यापैकी कुंडल गट नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली काम करत होता. जी.डी. लाड, आप्पासाहेब लाड, उत्तमराव पाटील, नागनाथ नायकवडी, नाथाजी लाड यांच्यासारखे कार्यकर्ते नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली काम करीत होते.

नाना पाटील व त्यांच्या सहकारी मित्रांनी रेल्वे गाड्या लुटणे, तारा तोडणे, सरकारी बंगले जाळणे, पोस्टाच्या पेट्या लुटणे अशा कार्यक्रमांची अंमलबजावणी केली.[२४]

## नाना पाटील यांचे लढातंत्र :

म. गांधींच्या अहिंसा, सत्याग्रह, उपोषण हा स्वातंत्र्य प्राप्तीचा मार्ग सामान्य कार्यकर्त्यांच्या मनाचे कोडेच होते. त्यांच्या स्वातंत्र्य लढा तंत्रात भूमिगत होवून लढा देणे बसत नव्हत. परंतू नाना पाटील भूमिगत होवूनच स्वाातंत्र्याच्या लढ्यात उतरले होते. त्यांना एकच माहीत होते की , या देशातून इंग्रजांना घालवणे इंग्रजी राज्य नष्ट करणे याकरीता त्यांनी जंगल सत्याग्रहापासून वैयक्तिक सत्याग्रहापर्यंत सर्व लढातंत्राचा उपयोग केला. पुर्णत: गांधीजींच्या लढातंत्राने जाणे त्यांना शक्य नव्हते. कारण इंग्रजी सत्ता हीच मुळी भारतावर अत्याचार, अन्याय, जुलूम होता. म्हणून त्यांच्या मते या सत्तेला विरोध करण्यासाठी अपवादात्मक सशस्त्र मार्गाचा अवलंब करणे आवश्यक होते. पुढे नाना पाटील यांनीच सांगीतले की दडपशाहीसमोर लोक गप्प बसले असते तर तो नादाणपणा झाला असता . न्युनगंडाने व गुलामगिरीने दबलेले राष्ट्र पुन्हा शंभर वर्षे वर आले नसते[२४].

## भूमिगत चळवळीपुढे अडचणी :

घातपाती कृत्यात सामील झाल्याच्या आरोपावरून अनेक भूमिगत कार्यकर्त्यां विरुध्दच राजकीय गुन्हे नोंदविण्यात आले. त्यामुळे त्यांना पूर्वीप्रमाणे लोकांच्यात उघडपणे वावरुन कार्य करणे अशक्य झाले.

पोलीसांनी भूमिगत कार्यकर्त्यांच्या घरावर रात्री अपरात्री छापे घालणे , त्यांच्या कुटुंबीयांना विनाकारण उपद्रव देणे असे प्रकार सुरु केले. त्यामुळे जनतेत दहशत निर्माण झाली. ग्रामीण भागात पोलीस व सावकार, वतनदार, गावगुंड यांच्यात हातमिळवणी सुरु झाली. भूमिगत चळवळ बदनाम करण्यासाठी पोलीसांनी गुन्हेगार फराऱ्यांचेही सहाय्य घेतले. पोलीसांचा पाठींबा मिळताच दरोडेखोरांनी कॉंग्रेसच्या नावावर दरोडे घालण्यास सुरवात केली . वाळवा तालुक्यातील दरोडेखोर , गुंड लोक गांधी टोप्या घालून आणि आपण नाना पाटलांचे लोक आहोत असे सोंग करुन जनतेला छळु लागले. पोलीसांची त्यांना

आतून फूस होती. त्यामुळे जनतेमध्ये पुष्कळ ठिकाणी नाना पाटलां बद्दल गैरसमज पसरला. [२६] त्यामुळे लोकांच्या मनात कॉंग्रेस कार्यकर्त्याबद्दल शंका निर्माण झाली. त्रस्त झालेले लोक जेंव्हा पोलीसांकडे न्याय मागण्यासाठी जात तेव्हां पोलीस त्यांना '' जा तुमच्या कॉंग्रेस वाल्याकडे '' असे तुच्छपणे म्हणून धुडकावून लावत. शेवटी नाइलाजाने असे पिडलेले लोक किसन वीर , नाना पाटील , बर्डे मास्तर इतर भूमिगत नेत्यांना भेटले. भूमिगत नेत्यानी दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्याचे ठरवले. नाना पाटलांनी आक्टोंबर १९४२ मध्ये आप्पा मास्तरांच्या मळ्यात मुख्य भूमिगत नेत्यांची बैठक बोलावली. बैठकीत असे ठरले की आप्पा मास्तर यांनी पश्चिम भागातील आणि जी. डी. लाड व ज्ञानूसंतू जाधव उर्फ उस्ताद यांनी पूर्व भागातील दरोडेखोरांना भेटून त्यांना दरोडे घालण्या पासून परावृत्त करावे असे ठरले.

## प्रतिसरकार कशासाठी :

१९४३ च्या सुरवातीला भूमिगत चळवळीत शैथिल्य निर्माण झाले. या चळवळीतून आपणास नेमके काय साधावयाचे आहे ? हा प्रश्न कार्यकर्त्यांना भेडसू लागला. घातपाती व विध्वंसक कृत्यांवर भर देण्याएवजी संघटीत प्रतिकाराची योजना आखून तिची अंमलबजावणी केली पाहीजे असा विचार पुढे आला . नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली असे ठरविण्यात आले की , भूमिगतांची शिस्तबध्द संघटना उभारावी मिळतील तितकी शस्त्रे जमा करावीत आणि गमिनी काव्याचा अवलंब करुन संघटीतरित्या सरकारशी संघर्ष करावा.

## प्रतिसरकारची स्थापना :

१ जून १९४३ रोजी कामेरी येथे ऊसाच्या शेतात प्रमुख भूमिगतांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत जे निर्णय घेण्यात आले त्यातूनच प्रतिसरकार उदयास आले. प्रतिसरकार हे मुलतः निरनिराळ्या प्रसंगाच्या संयोगांचे फलीत होते. आणि जिल्ह्यात

आंदोलंन चालू ठेवण्याच्या प्रयत्नांतून ते उत्क्रांत झाले. प्रतिसरकार कल्पना कोणा एका व्यक्तिची किंवा गटाची नव्हती. किस्न वीर यांची डिक्टेटर म्हणून निवड करण्यात आली.[२७]

## प्रतिसरकारची ध्येयधोरण :

या प्रतिसरकारच्या कारभराची धोरणे व मर्यादा आणि कक्षा ठरविण्यात आल्या . त्यामध्ये मुख्यत: जमीनिमालकी - हक्काच्या प्रस्थापित संबंधाना धक्का न लावता इतर प्रश्नासंबंधी न्यायनिवाडा करणे , अन्नधान्य , बाजारव्यवस्था , सावकारी जबर व्याज व कर्जफेडीचे जुलूम , देव्याघेव्याचे व्यवहार , स्त्रीविषयक गुन्हे वा अन्याय इत्यादी बाबी न्यायदानात समाविष्ठ करण्यात आल्या.

## प्रतिसरकारची रचना :

सातारा प्रतिसरकारची रचना भूमिगत क्रांतीकारकांनी केली. औंधच्या प्रयोगातून कांही सुधारणा करुन प्रतिसरकार मुख्यत : तीन भागात विभागले होते. हे तीन भाग म्हणजे.

१) तुफानसेना.

२) लोकराज्य.

३) न्यायव्यवस्था.

## १) तुफानसेना :

तुफानसेना हा सातारच्या प्रतिसरकारचा महत्वाचा घटक होता. दरोडेखोर, सावकार , सरकारचे खबरे , हस्तक , व समाजकंठक यांना शह देण्यासाठी या सेनेची स्थापना केलेली होती. नाना पाटील यांनी या सेनेची जबाबदारी जी. डी. लाड यांच्यावर टाकली. गांवसंरक्षण स्वातंत्र्यलढ्यात कामास आलेल्या व तुरुंगात गेलेल्या

वीरांच्या घराची देखरेख, दारुबंदी , अस्पृश्यता निवारण इत्यादी प्रकारचे काम तुफान सेना करत होती. [२८]

## २) लोकराज्य / ग्रामराज्याची स्थापना :

प्रतिसरकारने सातारा जिल्ह्यात ग्रामराज्याची केलेली स्थापना ही एक ऐतिहासीक घटना होती. ब्रिटीश शासन यंत्रणेला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याच्या या गरजेतून ग्रामराज्याच्या स्थापनेची कल्पना पुढे आली. क्रांतीकारकांनी स्थापन केलेले प्रतिसरकार हे आपले सरकार आहे असा विश्वास जनतेत निर्माण करण्याचा तर तिचे प्रश्न मार्गी लावले पाहीजेत जनतेवर होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन करुन तिच्या संरक्षणाची हमी घेतली पाहिजे व तिला खराखुरा न्याय मिळवून दिला पाहीजे. जनतेची ही रास्त अपेक्षा पूर्ण करावयाची तर ब्रिटीश सत्तेला केवळ विरोध करुन भागणार नाही. यापूढे जनतेच्या गरजा विचारात घेऊन प्रतिसरकारने विधायक कार्याची जबाबदारी अंगावर घेण्याची गरज आहे. याची जाणीव प्रतिसरकारच्या नेत्यांना झाली. याच कल्पनेतून ग्रामराज्याची स्थापना झाली. [२९]

### ग्रामराज्याची न्यायदान व्यवस्था :

ग्रामराज्याने ग्रामीण भागातील जनतेला न्याय मिळवून देण्याच्या प्रश्नाला अग्रक्रम दिला. त्यासाठी ग्रामराज्यअंतर्गत गावोगावी न्यायदान मंडळाची निर्मीती करण्यात आली. औंध संस्थानच्या राज्यघटनेच्या धर्तीवर ग्रामराज्याची एक घटनाही बनविण्यात आली . जनतेला त्वरीत व स्वस्त न्याय मिळवून देणे हे न्यायदान मंडळाचे मुख्य उद्दिष्ट होते.

ग्रामराज्यांच्या न्यायदान व्यवस्थेची रचना तीन पातळीवर करण्यात आली होती. न्यायदान व्यवस्थेच्या अगदी तळाशी गावपातळीवर प्रत्येक गावासाठी गावसमितीची किंवा ग्रामपंचायतीची स्थापना करऱ्यात आली होती. गावातील तंटे व वाद प्रथम गावसमिती पुढे

आणले जात असत त्या त्या गावातील प्रतिसरकारशी संबंधीत असलेल्या आणि शुध्द चारित्र्यांच्या व्यक्तिची पंच म्हणून गावसमितीवर नियुक्ती केली जात असे.

गाव समितीच्यावर साधारणतः सात ते तेरा गावासाठी एक गटसमिती होती. गावसमितीने दिलेल्या निर्णयावर गटसमितीकडे अपील करता येत असे. गटसमिती शक्यतो ज्या गावचे अपील असेल, त्या गावात जाऊन न्यायनिवाडा करीत असे.

गटसमितीच्यावर सर्वात वरच्या पातळीवर मध्यवर्ती समितीची स्थापना करण्यात आली होती. गटसमितीच्या निर्णयाविरुध्द मध्यवर्ती समितीकडे अपील करण्याची पक्षकारास मुभा होती. मात्र मध्यवर्ती समितीचा निर्णयच अखेरचा मानला जात असे. प्रतिसरकारचे ज्येष्ट कार्यकर्ते मध्यवर्ती समितीत सभासद म्हणून काम करीत असत.

ग्रामराज्यांच्या न्यायमंडळापुढे अनेक प्रकारचे खटले चालविण्यासाठी येत असत. त्यामध्ये प्रामुख्याने जमीन विषयक तंटे, देण्या घेण्याचे व्यवहार , सावकारीसंबंधी प्रकरणे , गहाणवटीचे वाद यांचा भरणा असे याखेरीज स्त्रियांवरील अत्याचार , मारहाणीची प्रकरणे , गावातील गुंडापासून होणारा उपद्रव , घरगुती भांडणे , भाऊबंदकीचे वाद , यांसारख्या बाबीही न्यायनिवाड्यासाठी न्यामंडळापुढे येत असत. [३०]

सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकारच्या धुरीणांनी आपल्या विचारांच्या कुवतीनुसार ग्रामराज्याची स्थापना केली आणि जनतेच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला नाना पाटील आणि सातारा जिल्ह्यातील भूमिगत यांनी स्थापन केलेल्या प्रतिसरकारचा विचार करता असे दिसून येते की. सातारा जिल्ह्यातील देशभक्तांनी इंग्रजांची सत्ता नष्ट करीत असताना आपल्या जनतेला आपण न्यायावर आचारलेले. सामान्य जनतेच्या समस्या सोडविणारे पर्यायी सरकार दिले पाहीजे असा विचार केलेला दिसतो. सरकार चालवायचे म्हणजे कांही नियम पाहिजेत. यांचाही विचार या भूमिगतांनी केला होता. त्याप्रमाणे शेजारच्या औंध संस्थानच्या राज्यघटनेच्या धर्तीवर ही घटना तयार केली आणि या घटनेनुसार ग्रामराज्याचा कारभार पाहिला. [३१]

## ३) प्रतिसरकारची न्यायव्यवस्था :

ब्रिटीश न्यायालयात लोकांना न्याय मिळत नसताना प्रतिसरकारने आपली खास न्यायव्यवस्था तयार केली. निरनिराळ्या विभागासाठी स्वतंत्र न्यायमंडळे होती. या न्यायालयातून लोकांना स्वस्त व नि:पक्षपाती न्याय स्वत: च्या गावातच मिळत असे. निर्णयाच्या अमंलबजावणीसाठी दहशतवादी गटाचा उपयोग होत असे. साताऱ्यातील न्यायदान व्यवस्थेला ग्रामराज्य म्हणूनही संबोधण्यात आले होते. न्यायदानाचे काम योग्य प्रकारे व्हावे म्हणून बंदोबस्तासाठी पुर्व भाग जी. डी. लाड यांच्याकडे , पश्चिम भाग कासेगांवकर वैद्य यांच्याकडे , दक्षिणभाग पांडूमास्तर यांच्याकडे आणि उत्तर भाग किसन वीर व पांडूतात्या बोराटे यांच्याकडे होता. याशिवाय गटन्यायमंडळ , फिरते किंवा जनता न्यायमंडळ व सर्वोच्च न्यायालय पण कार्यरत होती. [३२]

३ ऑगस्ट १९४३ रोजी शिराळा पेठेतील वाटेगांवजवळचे पणुंब्रे या गावाच्या हद्दीत डोंगरात बैठक झाली. प्रतिसरकारच्या इतिहासातील ही सर्वात महत्वाची बैठक , सर्वात मोठी. कामेरीत ठरलेल्या निर्णयाची सविस्तर योजना बनविणारी सर्वात जास्त व्यापक, आक्रमक , एकमताची , भारताचे स्वातंत्र्य जवळ आणणारी . श्री . बर्डे मास्तर जोशीकाकांनी मुंबई भेटीचा वृतांत सांगितला. श्री. अच्युतराव म्हणाले '' श्री. शांताराम इनामदार यांची आणि माझी भेट झालेली नाही मी त्यांच्याकडे अगर इतर कोणाकडेही लेखी अगर तोंडी चळवळ थांबिवण्याबद्दल कळविलेले नाही. मी असे कसे कळविन ? स्थानिक चळवळीसंदर्भात सर्व निर्णय तुमचे तुम्ही घ्यायचे आहेत. मला परिस्थितीची पूर्व कल्पना नाही. जनतेत चळवळीसंदर्भात गैरसमज असतील आणि विश्वासावर आधारलेला क्रियाशील पाठींबा नसेल तर चळवळ थांबविलेली बरी ! पण जनता आणि कार्यकर्ते चळवळ चालवायला अनुकूल असतील तर शेवटचा कार्यकर्ता अटक होईपर्यंत चळवळ चालू ठेवायला माझी हरकत नाही.चळवळ शिस्तबध्द , नैतिक असावी. [३३]

बैठकीसमोर सर्वात महत्वाचा प्रश्न होता चळवळ कोणाच्या नावांने, कोणाच्या अंतिम विचाराने चालवायची ? ज्याच्या नावाने चळवळ चालवायची तो नेता विचाराने क्रांतिकारी असला पाहिजे. त्याला हौतात्म्य प्राप्त होईपर्यंत कच न खाणारा, आक्रमक असला पाहीजे. भूमिगत जीवनाची त्याला सवय असली पाहिजे. त्याचे चारित्र्य धवल , आदरणीय असले पाहीजे. तो ज्येष्ठ असला पाहिजे. सातारच्या सर्वसामान्य जनतेला तो माहित असला पाहिजे. सातारा जिल्ह्यातील गटांना, व्यक्तींना नेता म्हणून त्याचे नांव सर्वांना मान्य असले पाहिजे. सर्व गटांनी केलेल्या सर्व कृत्याची जबाबदारी आपल्या नावांवर घेण्याची त्याची तयारी असली पाहिजे. त्याला अतिगुप्त भूमिगत पध्दतीने रहावे लागणार. तो चळवळीचे शान, मान , कल्याण , पंत्राण , असल्यामुळे ब्रिटीश त्यांनाच पकडण्याचा जास्त प्रयत्न करणार तेंव्हा क्रांतिकारी जीवनाचे यश - अपयश , धोके, धावपळी , सारे अग्निदिव्य सहन करण्याची त्याची तयारी असली पाहिजे. तो सर्वांना बरोबर घेऊन जाणारा , सर्वांचे भवितव्य ज्याच्या हाती सुरक्षीत आहे, अशी भूमिगतांची खात्री आहे. असा तो एकमेवद्वितीय असला पाहिजे. तोच या चळवळीचा नेता आहे असा जनता , पोलीस , सरकार यांचाही विश्वास बसला पाहिजे . इतका त्याचा पूर्व इतिहास लढावू , शक्तीशाली असला पाहिजे , विश्वासर्हता हा त्याचा स्थायीभाव असला पाहिजे. तो निश्चित , नेमक्या , ठाशीव , टोकदार निर्भय भूमिका घेणारा आणि वठवणारा असला पाहिजे . अशा अनेक पध्दतीने विविध मुद्यांवर चर्चा झाली त्या नावांवर चर्चेपूर्वी सर्वांचे एकमतच होते. ते नांव होते, " **क्रांतिसिंह नाना पाटील** "[३४] यांचे , नावाचा उच्चार बहुमुखातून झाला. स्विकार सर्व मुखातून झाला. बैठक गुप्त , शांतपणे चालावी अशी थोरांची अपेक्षा , तरीही तरुणांनी ' महात्मा गांधी की जय ' ! ' क्रांतिसिंह नाना पाटलांचा विजय असो ' ! अशा गगनभेदी घोषणांनी डोंगरदऱ्या दणाणून सोडल्या. ठराव पास झाला. एकमताने पास झाला. त्यामुळे इतिहासाने साताऱ्यातल्या स्वातंत्र्य चळवळीला " नाना पाटलांची प्रतिसरकारची चळवळ " असे अन्वर्थक नांव दिले. कष्टकरी निरक्षर चळवळीने तिला

''नाना पाटलांची पत्रि - सरकार चळवळ '' या शब्दात अजरामर बनविले. चळवळीच्या सर्व शिल्पकार क्रांतिकारकांनी अखेरपर्यंत या ऐतिहासिक सत्याला गालबोट लागू दिले नाही.

पणुंब्रे बैठकीने प्रतिसरकारची कार्यकारणी जाहीर केली. सातारा जिल्ह्याचे आठरा विभाग करुन त्यांचे विभाग नायक व उपनायक जाहीर केले. त्यामध्ये शितुर मुरूग्याचीवाडी बैठकीत केवळ डिक्टेटर आणि संघटक , संपर्कप्रमुख पक्षसंदर्भात थोडे फार बदल झाले. बाकी सर्व कार्यकारीणी बहुश : अखेर पर्यंत तशीच राहीली.

| | | |
|---|---|---|
| प्रमुख नेते | - | क्रांतिसिंह नाना पाटील |
| डिक्टेटर | - | दे. भ. किसनवीर (आबा ) |
| संघटव | - | क्रांतिवीर नाथाजी लाड |
| संघटक | - | क्रांतिवीर डी. जी. देशपांडे. |

| गट | गटनायव | उपनायव |
|---|---|---|
| १) वाटेगांव | श्री. बर्डे मास्तर | श्री. अंतुकाका बर्डे |
| २) कासेगांव | श्री. बाबुजी पाटणकर | कॉ. शेखकाका |
| ३) वाळवे | श्री. नागनाथ नायकवडी | हु. किसन अहिर |
| ४) कराड (इंदोली ) | श्री. धन्वंतरी दादा | श्री. माधवराव जाधव |
| ५) किंवळ | श्री. भिकू नाना किंवळकर | श्री. दत्तोबा काटकर |
| ६) तासगांव , कुंडल | श्री. जी. डी. (बापू ) लाड | श्री. ईश्वरा लाड |
| ७) खानापूर तालुका | श्री.भगवानरावमोरे(बप्पा ) | श्री. गोविंदराव मिरगे |
| ८) बिळाशी | श्री. गणपतराव पाटील | श्री.बाबुराव चरणकर |
| ९) चरन | श्री. ज्तोशीकाका | श्री. दत्तोबा लोहार |
| १०) कुमटे | श्री. पांडुरंग बोराटे (तात्या) | श्री.बाबुराव जंगम |
| ११) रहिमतपुर | श्री. सोपानराव घोरपडे | श्री. विठ्ठलराव भोसले |

| | | |
|---|---|---|
| १२) वाई | श्री. द्वारकानाथ जोशी | श्री. अण्णा पंत |
| १३) कवठे (वाई) | श्री. किसनवीर (आबा) | श्री. आबा ढेरे |
| १४) सातारा | श्री.बाबुराव घोरपडे | श्री. शामराव पाटील |
| १५) लिंब (गोवे) | श्री.बाबुराव जगताप | श्री. विष्णू सोनमळे |
| १६) म्हावशी | श्री.बुवा म्हावशीकर | श्री. म्होप्रेकर (पाटील) |
| १७) खेड बुद्रुक | श्री. विष्णू डोईफोडे | श्री. दादा पाटील |
| १८) बुध , पाचेगांव | श्री.बाबुराव कचरे | श्री. लाला इंगळे[३५] |

## प्रतिसरकारचे ऐतिहासिक महत्त्व :

१९४३ ते १९४६ या काळात प्रतिसरकार अस्तित्वात होते. या तीन वर्षाच्या काळात या सरकारने जी अनेक लोकोपयोगी कामे केली, ती ऐतिहासिक स्वरुपाची आहेत. म्हणूनच या कार्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. ''प्रतिसरकार ही एक राजकीय , सामाजिक व आर्थिक अन्याय दूर करुन या सर्व क्षेत्रात क्रांती घडवून आणणारी चळवळ होती. या सरकारने इंग्रजांच्या विरोधी दंड थोपटून अन्यायाला वाचा फोडली. पाटील , कुलकर्णी , सावकार , दलाल , व्यापारी , साम्राज्यवादी , वतनदार आणि इतर टग्यांचा बंदोबस्त करुन सामाजिक समता , न्याय प्रस्थापित केला. ग्रामसुधारणा , शिक्षणप्रसार, विषमता दूर व्हावी , हुंडा पध्दती नष्ट व्हावी , कमी खर्चामध्ये ,लग्ने व्हावीत , अस्पृश्यता नष्ट व्हावी.[३६]

## भूमिगत जीवनाची समाप्ती :

इ. स. १९४६ च्या मार्च महिन्यात मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाच्या निवडणुका पार पडल्या या निवडणुकीत काँग्रेसने फार मोठा विजय मिळवला. बाळासाहेब खेर यांची

मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. अशा रीतीने मुंबई प्रांतात काँग्रेसचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले.

नव्या मंत्रीमंडळाने भूमिगत कार्यकर्त्यांवरील वॉरंटे रद्द करण्यासंबंधी लगेच निर्णय घेतला नाही. नाना पाटलांवरील वॉरंट रद्द झाले तरी, त्यांच्या इतर कार्यकर्त्यांवरील वॉरंटे कायम होती. त्यामुळे जोपर्यंत सर्व भूमिगत कार्यकर्त्यांवरील वॉरंटे रद्द होत नाहीत , तोपर्यंत मी देखील प्रकट होणार नाही , अशी भूमिका नाना पाटलांना घ्यावी लागली. अखेरीस सरकारने सर्व कार्यकर्त्यांवरील वॉरंटे रद्द केली. त्यानंतर ७ मे १९४६ रोजी नाना पाटील आपल्या सर्व सहकाऱ्यांसह कराड तालुक्यातील कोणेगांव येथे प्रकट झाले.[३७]

सातारा जिल्ह्यातील जनता आंदोलन हे हिंदी स्वातंत्र्य चळवळीच्या महाभारतातील एक अत्यंत रोमहर्षक पर्व हाऊन गेले.बेचाळीसच्या क्रांतीमंत्रान जागृत केलेल्या जनतेला तिच्या विराट स्वरुपांचा अत्यंत आश्चर्यकारक आणि रोमहर्षक दर्शन त्याने घडवले. साताऱ्यातील ह्या क्रांतिकारक आंदोलनाचे सुत्रधार क्रांतिसिंह नाना पाटील हे होते. त्यांनीच सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार म्हणा - किंवा पत्रिसरकार म्हणा स्थापन करुन साऱ्या भारताचे लक्ष आपल्याकडे ओढून घेतले. कारण, भारतीय स्वातंत्र्याच्या दिडशे वर्षांच्या झगड्यात असा अभुतपूर्व आणि धाडसी प्रयोग कोणीही केला नव्हता[३८].

नाना पाटील भूमिगत राहून ते जिल्ह्यातील भूमिगत चळवळीला मार्गदर्शन करत होते. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीचे ते प्रेरक शक्ती होते. ब्रिटिश सरकारने नाना पाटलांना पकडण्यासाठी प्रथम दोन हजाराचे बक्षीस जाहिर केले. त्याचा उपयोग झाला नाही म्हणून दुसऱ्यांदा पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले[३९]. जिल्ह्यातील भूमिगत चळवळीच्या घडामोडींशी नाना पाटील यांचा निकटचा संबंध होता आणि ही गोष्ट मुंबई ईलाक्याच्या गव्हर्नरच्या नजरेतून सुटलेली नव्हती. तो गव्हर्नर जानेवारी १९४३ च्या आपल्या पाक्षिक अहवालात नाना पाटलांचा उल्लेख सातारा जिल्ह्यातील ''Notorious

Congressman'' 'बदमाश कॉंग्रेसवाला' असा करतो. तोच गव्हर्नर आपल्या नोव्हेंबर १९४३ च्या पाक्षिक अहवालात म्हणतो,

''It is clear from several incidents that have been reported during recent weeks from Satara that the district continues to be a focuss of serious disturbances. It is known that a few Gangs are still at large and such of them as have a political inspiration are working under the leadership of local congressman who has remain underground since August 1942, one Nana Patil. Large rewards have been offered for information leading to his arrest and that of his associates and the CID is working in strength in the district.''[४०].

चलेजाव चळवळ व भूमिगत लढा १९४२ च्या आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून नाना पाटलांनी पोलीसांशी लपंडाव खेळण्याचे तंत्र अवलंबिले होते व शेवटपर्यंत पोलीसांच्या हाती लागले नाहीत. चळवळीच्या प्रचारासाठी तासगांव, वाळवा, खानापूर, कराड इत्यादी तालुक्यात बऱ्याच ठिकाणी त्यांच्या जाहिर सभा झाल्या. जाहिर सभांमध्ये भाषण करणाऱ्या नाना पाटलांना जनतेच्या निस्सिम प्रेमामुळे व सहकार्यामुळे पोलीस पकडू शकले नाहीत[४१].

**नानांचा गनिमीकावा :**

१९४३ च्या आषाढ महिन्यातील गोष्ट. नाना पाटलांची ८० वर्षांची आई कॉलऱ्याने फार आजारी होती.

''आई फार आजारी आहे; ताबडतोब शेवटची भेट घेण्यास या'' असा एका दुताकरवी नानांना निरोप गेला. आजुबाजूच्या गावांमध्ये पोलीसांच्या पार्ट्या नानांच्या मार्गावर दबा धरुन होत्याच. आईच्या भेटीस नाना पाटील येणार ही त्यांना खात्री होती.

म्हातारी वारल्याची वार्ता सर्वत्र पसरली रात्री दहाची वेळ; डोक्यावर घोंगड्याची खोळ पांघरून चार पाच सवंगड्यांसह नाना जड अंत:करणाने आपल्या घरात शिरले.

गावाबाहेर त्यांनी सशस्त्र टोळी ठेवली होती. नाना घरात शिरताच एकच आरडाओरडा झाला. पोलीसांचा अंदाज नक्की ठरला. त्यांनी ताबडतोब घराला वेढा दिला.

रात्रीच्या बारा वाजता म्हातारीची ताटी बांधून तयार झाली. जळणाची गाडी पण भरली. शेणी, लाकडे व पेटवणी करीता थोडे गवत गाडीत भरले होते. गाडीवानाने गाडी पुढे हाकारली. गावापासून दोन मैलावर कृष्णा नदी वाहत होती. तिच्या पवित्र काठावर अत्यंसंस्कार करण्याची पध्दती होती. गाडी नदीच्या रोखाने निघाली. पाच मिनिटातच मंडळींनी तिरडी उचलली. बाहेर येताना पोलीसांनी सगळ्यांना नीट तपासून सोडले.

आता नाना पाटील घरात नक्कीच सापडणार, या कल्पनेने पोलीस-इन्सपेक्टर दहा बारा सशस्त्र पोलीसांनीशी घरात शिरला. दहा हजाराचे बक्षिस आता आपल्यालाच मिळणार या खुशीमध्येच तो होता! पण, घरात जावून पाहतो तो बायका ओक्सा-बोक्सी रडत होत्या. नाना पाटलांचा तेथे कोठे पत्ताच नव्हता.

पोलीसांनी सर्व घर धुंडाळले, पण नानांचा पत्ता लागला नाही. इतक्यात एक पोलीस पळत पळत आला आणि त्याने इन्सपेक्टरला घाबरत घाबरत सांगीतले की, ''दोनशे सशस्त्र लोकांनीशी नाना पाटील टोळीसह गावाच्या बाहेर आले आहेत!''.

पोलीस इन्सपेक्टरच्या तोंडचे पाणीच पळाले. या टोळीशी तोंड कसे द्यावे, हेच त्याला समजेना. त्याने ताकारी गावाहून दोनशे पोलीसांची पार्टी मागविली. वाटेत नाना पाटलांची टोळी उभी होती. तीन तासापर्यंत दोन्ही गटाचे युध्द चालले होते.

इकडे गावाच्या बाहेर म्हातारीची तिरडी जाताच, तिरडीतून कोणीतरी उडी मारली! नाना पाटील होते ते! तिरडीवर ठेवलेल्या बंदुका खांदेकरी मंडळींनी हाती घेतल्या. जळणाच्या गाडीत म्हातारीचे प्रेत दडविलेले होते. हिंदु शास्त्राप्रमाणे विधिपूर्वक म्हातारीच्या शवाला नानांनी शांतपणे अग्निसंस्कार दिला. [४२]

**गिलबर्टचा वेढा :**

सातारच्या प्रतिसरकारचे प्रमुख क्रां. नाना पाटील यांना पकडले की सातारची चळवळ थांबेल म्हणून ब्रिटिश सरकारने गिलबर्ट नावाच्या खास डी.एस.पी. ची नेमणूक केली. गिलबर्टने नाना पाटलांना पकडण्याचा जंग जंग प्रयत्न केला. एकदा तर त्याने दोन हजारी पोलीसांसह कुंडलला पहाटेच वेढा दिला. गावातले प्रत्येक घर न् घर पिंजून काढून झाडून सर्व पुरूष चावडीवर गोळा केले शौचाला जणारी माणसेही तांब्यासह धरुन आणली. यामध्ये २५-३० जण भूमिगत होते. आता गिल्बर्टने विचारले, ''गावातल्या सर्व माणसांना कोण ओळखतो ते सांगा'' तेंव्हा गणपती गायकवाड चटकन पुढे आला व म्हणाला ''मी न्हावी हाय साहेब गावातल्या लोकांच्या दाढ्या करत फिरत असतो. मी गावातल्या सगळ्यांना ओळखतो'' गिल्बर्ट साहेबाने ''ठिक आहे'' म्हणून त्यास संमती दिली.

गिल्बर्टजवळ भूमिगतांची यादी होती. पण प्रत्येक भूमिगताची टोपण नावे होती. हे त्यास माहीत नव्हते. गणपत न्हावी टोपण नावानीशी प्रत्येकाला ओळखत होता. गिलबर्ट प्रथम न्हाव्यास हळूच नाव विचारी व नंतर लांब उभा केलेल्या व्यक्तीस मोठ्याने नाव सांगण्यास सांगे. न्हावी व भूम्मिगत यांची नावे एकत्र येत अशाप्रकारे टोपण नावामुळे सर्व भूमिगत सुखरूप सुटले.[४३]

प्रसिध्द गांधीवादी नेते आधुनिक भारत या ग्रंथाचे लेखक आचार्य श.द.जावडेकर यांनी खालील शब्दात नाना पाटील यांच्या कार्यचे मुल्यमापन केले आहे

''गांधी युगात सातारा जिल्ह्यात कॉंग्रेसची शक्ती वाढवण्याचे काम अनेक देशभक्तांनी केले, परंतु नाना पाटील यांच्या इतकी छाप किंवा मोहीनी इतर कोणत्याही व्यक्तीला शेतकरी वर्गावर पाडता आलेली नाही....... या शेतकरी वर्गाला स्वातंत्र्याच्या क्रांतीची प्रेरणा देण्यास नाना पाटील कारण झाले आहेत. त्यामुळे १९४२ च्या क्रांतिकाळातील आंदोलनात साताऱ्यात ज्या क्रांतीची ज्योत पेटली, तिचे बरेच श्रेय नाना पाटील यांच्याकडे जाते....... पण नाना पाटलांनी राष्ट्रसभेच्या स्वातंत्र्यनिष्ठेला शोभेल

असेच आपले धोरण ठेवले, आणि सन १९४२ साली विद्यार्थीवर्गातून जी नवी क्रांतीकारक पीढी साताऱ्याला पुढे आली तिला प्रेरणा देवून साताऱ्यात एक प्रचंड क्रांतीज्योत पेटविली.[४४]

भूमिगत राहून ब्रिटिश सरकारच्या सत्तेशी क्रान्तिसिहांच्या पुढे गांधीजींच्या बरोबर छ. शिवाजी महाराजांचा आदर्श पुढे असावा असे वाटत असे.

क्रान्तिसिंह नाना पाटील काँग्रेसचे सच्चे पाईक होते. पण स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यांना काँग्रेसची धोरणे पटेनाशी झाली. १३ जुन १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्षात क्रां. नाना पाटील यांनी प्रवेश केला. शेतकरी कामगार पक्षाच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी शेकडो सभा नाना पाटलांनी सर्व महाराष्ट्रभर घेतल्या. शेतकरी कामगार पक्षाचा विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविला. दुर्देवाने शेतकरी कामगार पक्षातील ऐक्य नंतरच्या काळात टिकून राहिले नाही.

इ.स. १९५१ च्या ऑक्टोबर महिन्यात दत्ता देशमुख यांचा गट शेतकरी कामगार पक्षातून बाहेर पडला आणि त्याने कामगार किसान पक्ष या नावाने स्वतंत्र पक्ष स्थापन केला. शेतकरी कामगार पक्षातील दत्ता देशमुख, नाना पाटील, काकासाहेब वाघ, एस.के.लिमये, व्ही.एन. पाटील इ. नेते नव्या पक्षात सामील झाले. कामगार किसान पक्षानेही मार्क्सवादी तत्वज्ञानाचाच स्विकार केला. नाना पाटलांनी या पक्षाच्या वाढीसाठीही आतोनात कष्ट उपसले.[४५]

कामगार किसान पक्षाला महाराष्ट्राच्या राजकारणात फारसे भवितव्य नाही ही गोष्ट पहिल्या सार्वजनीक निवडणूकीच्या निकालाने स्पष्ट झाली. या पक्षातील कांही नेते मंडळी काँग्रेस पक्षात सामील झाली. नाना पाटील यांनी सार्वजनीक जीवनाच्या सुरवातीपासून ज्या सामाजिक क्रांतीच्या तत्वज्ञानाचा पुरस्कार केला आणि शेतकरी कामगारांच्या राज्याचे स्वप्न पाहीले ते स्वप्न मार्क्सवादाच्या मार्गानेच साकार होवू शकेल अशी त्यांची खात्री पटली. त्याप्रमाणे त्यांनी इ.स. १९५३ मध्ये कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. नाना पाटलांनी अनेक पक्ष बदलले, पण त्यांची देहनिष्टा मात्र कधीच बदलली नाही.

१९५७ ची लोकसभा नित्रडणूक त्यांनी सातारमधून लढविली व ती जिंकली. १९६७ ची लोकसभेची निवडणूक त्यांनी बीड मधून लढविली व जिकूंनही दाखवली. १९६५ साली धान्यास रास्त भाव मिळाला पाहिजे, म्हणून डाव्या पक्षाच्या पुढाऱ्यांनी जो ऊग्र लढा दिला, त्यात क्रान्तिसिंह नाना पाटलांना अटक झाली व त्यांना येरवड्यात डांबून ठेवले.[४६]

अखेरच्या दोन अडीच वर्षात त्यांचे वास्तव्य वाळवे, पंढरपूर, हणमंतवडिये, सांगली या ठिकाणी होते. या काळातही ते आपल्या सर्व वेदना विसरून भेटीसाठी आलेल्या लोकांबरोबर गप्पा गोष्टीत रंगून जात असत. ६ डिसेंबर १९७६ रोजी त्यांचे प्राण पंचोत्वात विलीन झाले.

एवढा मोठा क्रांन्तिवीर देशभक्त, क्रांन्तिसिंह पण त्यांना आपण देशासाठी काही मर्दुमकी गाजवली आहे, असे कधी वाटले नाही. ''मी माझे कर्तव्य केले'' एवढेच ते म्हणत.

# संदर्भ - सुची

१. संपादक ॲड. पाटील सुभाष भगवानराव - स्मरणिका - क्रांतीसिंह नाना पाटील - पृष्ठ -३३

२. श्री. मोहिते बाळकृष्ण रावजी - अध्यक्ष; क्रांतीसिंह नाना पाटील पुतळा समिती, विटा- मुलाखत

३. संपादक ॲड. पाटील सुभाष भगवानराव - उप्परनिर्दिष्ट -पृष्ठ - ८०

४. डॉ. गुरव बाबूराव - उजळती प्रकाश रेषा - पृष्ठ -३७

५. डॉ. पवार जयसिंगराव - क्रांतीसिंह नाना पाटील - पृष्ठ -६

६. प्रा. पाटील विलास -- क्रांतीसिंह नाना पाटील - पृष्ठ - १०

७. दै. लोकमत - दि. ३ ऑगस्ट १९९९ विशेष पुरवणी - पृष्ठ - १

८. क्रांतीसिंह लाड जी. डी. - मुलाखत

९. ॲड. पाटील सुभाष भगवानराव -(हणमंत वडिये) -मुलाखत

१०.डॉ. गुरव बाबूराव - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - ४३

११.सा. नवयुग - दि. १२ मे १९४६ - पृष्ठ - १४

१२.श्री. मुळीक निवृत्ती दादाजी - (रि. प्राथमिक शिक्षक; रेठरेधरण) हस्तलिखीत (स्वा.सै. बापूसाहेब देशमुख यांच्यावरती) - पृष्ठ - ११

१३.संपादक सावंत शिवाजी व शिवणीकर राघव -क्रांतीसिहांची गावरान बोली -पृष्ठ- २४

१४.---- कित्ता ---- पृष्ठ - २५

१५.साप्ताहिक नवयुग - दि. १२ मे १९४६ पृष्ठ - २७

१६.प्रा. पाटील विलास - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - ८६

१७.डॉ. पवार जयसिंगराव - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - ५

१८.संपादक ॲड.पाटील सुभाष भगवानराव - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ ८४

१९.डॉ. शिंदे आबासाहेब - सातारचे प्रतिसरकार - व्यक्ति आणि प्रसंग - पृष्ठ - १२१

२०.---- कित्ता ---- पृष्ठ - १०१

२१.डॉ. शिंदे ए. बी. - द पॅरलल गव्हर्नमेंट ईन सातारा - पृष्ठ ८६

२२.---- कित्ता ---- पृष्ठ - ९१

२३.स्वा. सै. लाड जी. डी. - (कुंडल) - मुलाखत

२४.क्रान्तिवीर नायकवडी नागनाथ

२५.श्री. पाटील दिनकर विष्णू - अप्रकाशीत एम. फील. लघुशोध निबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - क्रां. नाना पाटील आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्याचे प्रश्न (नोव्हेंबर १९९२) - पृष्ठ - ९७

२६.सा. नवयुग - १२ मे १९४६ - पृष्ठ - २८

२७.श्री. ढगे सुभाष - प्रतिसरकार - पृष्ठ - ३१

२८.डॉ. शिंदे ए. बी. - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - १९९

२९.प्रा. पाटील विलास - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - ११९

३०.---- कित्ता ---- - पृष्ठ - १२०

३१.दै. पुढारी - दि. १ ऑगस्ट, १९९९ - पृष्ठ - ७

३२.डॉ. शिंदे आबासाहेब - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - १२

३३.डॉ. गुरव बाबूराव - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ १२५

३४.---- कित्ता ---- पृष्ठ - १३०

३५.---- कित्ता ---- पृष्ठ - १४०

३६.श्री. पाटील दिनकर विष्णू - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - १२५

३७.सा. नवयुग - दि. १२ मे, १९४६ - पृष्ठ - २५

३८.दै. मराठा - दि. ४ ऑगस्ट, १९६० - पृष्ठ - ३

३९.डॉ. शिंदे ए. बी. - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - २३९

४०.दै. लोकमत - दि. ३ ऑगस्ट १९९९ - पृष्ठ - ४

४१.---- कित्ता ----

४२.सा. नवयुग - दि. १२ मे , १९४६ - पृष्ठ - २८

४३.डॉ. पवार जयसिंगराव - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ - २५४

४४.दै. पुढारी - दि. १ ऑगस्ट, १९९९ - पृष्ठ - ७

४५.प्रा. पाटील विलास - उपरनिर्दिष्ट - पृष्ट - १४१

४६.दै. पुढारी - दि. ६ डिसेंबर, १९९९ - पृष्ठ - ५